पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०४/२०१७** वेळ - दुपारी **१.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पहिली सभा (विशेष सभा) शनिवार दिनांक **१५/०४/२०१७** रोजी दुपारी **१.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.सुनिल पाटील, (भा.प्र.से.)** संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सागर बाळासाहेब गवळी
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लावंड – कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा – संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.शहर सुधारणा समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

(मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)

**मा.नगरसचिव -** मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, शहर सुधारणा समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.सागर बाळासाहेब गवळी | मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | मा.संतोष बबन कांबळे |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.सभापती, शहर सुधारणा समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.सागर बाळासाहेब गवळी** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेसाठी विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.सभापती, शहर सुधारणा समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.सागर बाळासाहेब गवळी** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सागर बाळासाहेब गवळी** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.सागर बाळासाहेब गवळी** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सागर बाळासाहेब गवळी** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**

**( सुनिल पाटील )**

पिठासीन प्राधिकारी तथा

संचालक, संचालनालय,

भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा

शहर सुधारणा समिती (विशेष सभा)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा.सागर बाळासाहेब गवळी** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.शहर सुधारणा समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांचेकडे सुपुर्द करणेत येत आहे.

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपसभापती, शहर सुधारणा समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | मा.कदम शशिकांत गणपत | मा.डोळस विकास हरिश्चंद्र |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.उपसभापती, शहर सुधारणा समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.शहर सुधारणा समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.सभापती यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेसाठी विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.उपसभापती, शहर सुधारणा समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - २ | विषय क्रमांक - २
दिनांक - १५/०४/२०१७ | विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.शहर सुधारणा समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** हे एकच रितसर वैधपणे

नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १५/०४/२०१७

सुचक : मा.संतोष कांबळे अनुमोदक : मा.विकास डोळस

मा.शहर सुधारणा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या मंगळवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.सागर बाळासाहेब गवळी)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७२९/२०१७
दिनांक : १५/०४/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.